भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ BX 496789

TREASURY OFFICE NASIK
24 MAR 2023
STPHC ATO

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTARY ADV. HARSHAL S. KENGE NASHIK DISTRICT MAHARASHTRA GOVT. OF INDIA

| NOTARY |
| --- |
| NOTED & REGISTERED at Serial No. 918/23 |
| DATE 12/04/2023 |
| THIS DOCUMENT CONTAINS 01 Total Pages 45 |

॥ श्री ॥

## फ्लॅट हस्तांतर करारनामा

फ्लॅट हस्तांतर करारनामा आज दिनांक १२ माहे एप्रिल, इसवी सन २०२३, रोज बुधवार ते दिवशी, नाशिक मुक्कामी :-

**श्री. दिनेश जिभाऊ शिंदे**
उ. व. ४३ वर्षे, धंदा : व्यापार,
(AADHAR : 4971 0397 5872)
रा. मु. पो. सटाणा, ता. बागलाण,
जि. नाशिक.

} **लिहून घेणार**

यांसी....

**श्री. रवि मनमोहन तापडिया**
उ. व. ५७ वर्षे, धंदा : शेती व व्यापार,
(PAN : AAGPT 7769 R)
रा. फ्लॅट नं. ११ व १२, त्रिवेणी अपार्टमेंट,
नवीन पंडित कॉलनी, नाशिक

} **लिहून देणार**

**कारणे फ्लॅट हस्तांतर करारनामा लिहून देतो ऐसा जे की,**

१) **मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील, **मौजे नाशिक शहर** – या गावचे शिवारातील **सर्व्हे नंबर ६५६/१/१अ/१४,** चे मंजूर ले-आऊटमधील **प्लॉट नं. १४,** यांसी **क्षेत्र ४८५.४२ चौरस मीटर,** यांसी चतु:सिमा मंजूर ले-आऊटप्रमाणे. सदर प्लॉट मिळकतीवर मंजूर बांधकाम नकाशानुसार बांधण्यात आलेल्या व **त्रिवेणी अपार्टमेंट को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील **स्टिल्ट दुसऱ्या** मजल्यावरील **फ्लॅट नं. ११ व फ्लॅट नं. १२** यांसी एकत्रित **चटई क्षेत्र १००० चौ. फुट,** यांसी **बांधीव क्षेत्र १२०० चौ. फुट म्हणजेच १११.५२ चौ. मी.** यांसी चतु:सिमा...

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | साईड मार्जिन |
| पश्चिमेस | : | जिना व पलीकडील फ्लॅट नं. ९ व १० |
| दक्षिणेस | : | साईड मार्जिन |
| उत्तरेस | : | साईड मार्जिन |

येणेप्रमाणे चतु:सिमांकीत बांधीव फ्लॅट मिळकतीत असलेले स्वतंत्र वीज कनेक्शन, तदंगभूत वस्तूंसह तसेच सामाईकात असलेले जिने, टेरेस, मोकळी जागा वापरण्याचे हक्कांसह, तसेच जाणे–येणेचे वागवहिवाटीचे हक्कांसह मिळकत दरोबस्त.

सदर दस्तात लिहून घेणार यांचा उल्लेख 'तुम्ही/तुमचे, लिहून देणार यांचा उल्लेख 'आम्ही/आमचे' असा केलेला आहे. या सर्व सज्ञांमध्ये त्या प्रत्येकांचे वंशवारस, असायनीज, एक्झिक्युटर्स, ॲडमिनीस्ट्रेटर्स, लिगल रिप्रेजेंटेटिव्ह, सक्सेसर या सर्वांचा समावेश आहे. तसेच वर वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचा उल्लेख 'उपरोक्त/सदर फ्लॅट मिळकत' असा केलेला असून सदर फ्लॅट मिळकत ही या दस्ताचा विषय असलेली मिळकत आहे.

२) **मिळकतीची मालकी व अधिकार :–** वर कलम १ यात वर्णन केलेल्या दोन्ही फ्लॅट मिळकती ह्या लिहून देणार यांच्या मालकीच्या असून सोसायटी रेकॉर्डला व नाशिक महानगरपालिकेच्या दप्तरी लिहून देणार यांचे नावाची नोंद मालक म्हणून झालेली आहे.

येणेप्रमाणे लिहून देणार हे सदर फ्लॅट मिळकतीचे मालक असून सदर मिळकतीची पाहिजे तशी विल्हेवाट लावण्याचा लिहून देणार यांस पूर्ण हक्क व अधिकार आहे.

३) **व्यवहार :–** उपरोक्त फ्लॅट मिळकत खरेदी करणेत तुम्हास स्वारस्य असल्याने तुम्ही सदर मिळकतीसंदर्भातील आमचे हक्क व अधिकारांबाबतची सर्व कागदपत्रे तपासून आमचेबरोबर चर्चा केली. तुम्ही देणार असलेली फ्लॅट मिळकतीची किंमत प्रचलित बाजारभावानुसार योग्य व समाधानकारक असल्याने उपरोक्त फ्लॅट मिळकत आम्ही तुम्हास विक्री करण्याचे ठरवून तुमचे लाभांत प्रस्तुत हस्तांतर करारनामा लिहून देत आहोत.

४) **किंमत :–** तुमचे व आमचे दरम्यान उपरोक्त फ्लॅट मिळकतीची एकूण किंमत रक्कम **रु. ६७,००,०००/– (अक्षरी रुपये सदुसष्ट लाख मात्र)** इतकी ठरली असून सदर किंमतीस आम्ही तुम्हास उपरोक्त फ्लॅट मिळकत कायमची खरेदी दिली आहे. सदरची किंमत प्रचलित बाजारभावानुसार योग्य व बरोबर असून किंमतीबाबत वाद अगर तक्रार नाही. उपरोक्त फ्लॅट मिळकतीचे किंमतीचा भरणा तुमचेकडून आम्हास

प्रस्तुत दस्ताचे अखेरचे कलमात दर्शविल्याप्रमाणे मिळालेला व मिळावयाचा आहे.

५) **कब्जा :-** उपरोक्त फ्लॅट मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा तुमचेकडून आम्हास फ्लॅट मिळकतीचे किंमतीची संपूर्ण मोबदला रक्कम प्राप्त झालेनंतर खरेदीखतावर द्यावयाचा आहे. ही बाब उभयतांना मान्य व कबूल आहे.

६) **हस्तांतरणाचा व्यवहार :-** सदरचा व्यवहार हा विक्री/हस्तांतरणाचा असून उधार, उसनवारीचा अगर गहाणाचा नाही

७) **बंधनकारकता :-** सदरचा करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर, त्यांचे पश्चात त्यांचे वालीवारस व त्यांचे तर्फे हक्क सांगणाऱ्या हरएक इसमांवर बंधनकारक आहे व राहील.

८) **भरणा तपशील :** वर कलम १ यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचे किंमतीचा मोबदला तुम्ही आम्हास खालीलप्रमाणे दिलेला व द्यावयाचा आहे.

| रक्कम रुपये | तपशील |
|---|---|
| १७,००,०००/- | अक्षरी रुपये सतरा लाख मात्र तुमचेकडून आम्हास युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा सटाणा ह्या बँकेवरील चेक नं. ०१५२०३, दिनांक १२/०४/२०२३ अन्वये मिळाले, ते पावले. |
| ५०,००,०००/- | अक्षरी रुपये पन्नास लाख मात्र तुम्ही आम्हास आजपासून ३० दिवसांत कुठल्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन खरेदीखतावर द्यावयाचे आहेत. |
| **६७,००,०००/-** | **एकूण रुपये सदुसष्ट लाख मात्र.** |

येणेप्रमाणे तुमचेकडून आम्हास सदर व्यवहारापोटी आतापर्यंत रक्कम **रु. १७,००,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख मात्र)** इतकी रक्कम प्राप्त झाली असून उर्वरित रक्कम तुम्ही आम्हास खरेदीखतावर द्यावयाची आहे.

NOTARY
ADV. HARSHAL S. KENGE
NASHIK DISTRICT
MAHARASHTRA
REG. No. 14522
Valid up to 18/09/2024
GOVT. OF INDIA



येणेप्रमाणे फ्लॅट हस्तांतर करारनामा आज रोजी आम्ही तुमचे लाभांत राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून, उमजून व कोणत्याही धाक दडपणास बळी न लिहून दिला असे.

हा फ्लॅट हस्तांतर करारनामा.



श्री. रवि मनमोहन तापडिया

लिहून देणार



श्री. दिनेश जिभाऊ शिंदे

लिहून घेणार

साक्षीदार :

१) दिपक मधुकर सपकाळे

२) श्रद्धा ज्ञानेश्वर जाधव

NOTARY
HARSHAL S. KENGE
ADVOCATE & NOTARY
Dist. Nashik, Maharashtra
Reg. No. 14522 / 2019
Valid upto 18/09/2024
GOVT. OF INDIA

**BEFORE ME**

HARSHAL S. KENGE

A... dia

Chamber No.205-A, Maruti Chamber

Dist. Court Campus, C.B.S. Nashik